# सार्वजनिक संस्थांची प्रतिष्ठा

राजकीय अवकाशामध्ये 'अपमान' आणि तत्सम शब्द समोर येणं कुतूहलजनक नसलं तरी रोचक असतं. एका सार्वजनिक संस्थेच्या संबंधाने हा शब्द वापरला जाणं आणि तिथे काम करणाऱ्या व्यक्ती पार्श्वभूमीला ढकलल्या जाणं, हे रोचक आहे. भारतीय पंतप्रधानांनी सार्वजनिकरित्या अशी भाषा वापरल्यावर हे अधिक स्पष्टपणे दिसून आलं. नैतिकदृष्ट्या यातना देणारी अपमानाची भावना आणि 'निरपराध' झारखंड सरकार यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी सूचकरित्या हा शब्द वापरला. यातून पुन्हा एक रोचक शोध घेता येतो. सार्वजनिक संस्थांचा अपमान होऊ शकतो का? आणि, या प्रश्नाचं उत्तर होकारार्थी असेल तर, सार्वजनिक संस्थेच्या अपमानाचा दावा नैतिकदृष्ट्या वैध ठरण्यासाठीचा आधार कोणता असतो?

अपमानाची भावना निर्माण करणारा नैतिक संवेदनशीलतेचा घटक सार्वजनिक संस्थांमध्ये अंगभूतरित्या असतोच असं नाही, असं विवाद्यरित्या म्हणता येईल. मुळात या संस्था म्हणजे केवळ भौतिक रचना असतात. त्याचप्रमाणे, संस्थात्मक प्रक्रियांचा गैरवापर मानव करू शकत असला तरी मानवी अपमानाची झळ या संस्थांना बसते असं म्हणणं विचित्र ठरतं. या प्रक्रिया कोण हाताळतं आहे यावरून त्यांचं अपमानकारक किंवा मानहानीकारक असणं ठरतं, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. पण या संस्था कोणा एका व्यक्तीच्या नसतात, तर सार्वजनिक स्वरूपाच्या असतात, त्यामुळे त्यांना अमूर्त वैशिष्ट्य प्राप्त होतं. या दोन पैलूंमुळे अशा संस्थेला अपमानाची जाणीव होण्याची शक्यताच नसते. अशा परिस्थितीत सार्वजनिक संस्थेचा अपमान झाल्याचं म्हणता येत नाही, मग 'सरकारचा अपमान झाला आहे' यांसारखे दावे कसे समजून घ्यायचे?

सार्वजनिक संस्थेचा लोकशाही गाभा व प्रजासत्ताक स्वरूप काढून घेतलं आणि व्यक्तीकरणाची प्रक्रिया पार पाडली गेली, किंवा एकाच व्यक्तीकडे अथवा व्यक्तींच्या एखाद्या गटाकडेच सर्व संस्थात्मक सत्ता केंद्रित झाली, तरच तिचा अपमान झाल्याचा दावा स्वीकारणं शक्य आहे. व्यक्तीची अपमानाची नकारात्मक भावना किंवा आदराची सकारात्मक भावना संस्थेपर्यंत वाहून नेली जाते. या अर्थाने अपमान झाल्यासंबंधीची उक्ती या संस्थांना लागू होते. नैतिक दावे करणाऱ्या सार्वजनिक व्यक्तिमत्वांनी या संस्था बनलेल्या असतात.

पण 'संस्थांचा अपमान झाला' असा दावा करणं अपर्याप्त व अपूर्ण आहे. ठोस कारणं दिलेली असतील तरच हा दावा पूर्ण आणि वैध ठरतो. निराळ्या शब्दांत सांगायचे तर, सुशासनाची तुलनेने चांगली कामगिरी केलेल्या सरकारवर केलेला अवाजवी नैतिक आरोप, हा इथे अपमान मानलेला आहे. सरकार करत असलेल्या चांगल्या कामाविषयी कोणताही आदर न ठेवता हा अवाजवी आरोप केला जातो. या संदर्भात, एखाद्या सरकारने लोकांसाठी चांगलं काम केल्याचा पुरावा असतानाही त्याविषयी अनादर दाखवला तर तो अपमान मानता जातो.

तर, अपमान झाल्याचा दावा बेताल असू नये. त्यासाठी ठोस कारणं द्यायला हवीत आणि न्यायाच्या व्यापक तत्त्वामधून साधारणपणे या दाव्याची मांडणी व्हायला हवी. ठोस कारणांचं पाठबळ नसेल, तर या

दाव्याला पूर्वग्रहाने प्रेरित अवाजवी आरोपाचं 'विशेष स्थान' मिळतं, न्यायाच्या तत्त्वाचा संदर्भ त्यात येत नाही. सरकारच्या कालोचित व प्रामाणिक कृतीमधून ठोस कारण मिळतं. या संदर्भातील सरकार झारखंडमधील आहे. करबुडव्यांना दंड करणं किंवा झुंडहत्यांसाठी जबाबदार असलेल्या शिक्षा करणं, अशा गोष्टींची पूर्तता करून राज्यसंस्था अस्तित्त्वात असते. झुंडहत्यांसारख्या हिंसाचाराला आळा घालण्यात सरकारी संस्थांनी तत्काळ कारवाई केली, तर या संस्थांवरचा लोकांचा विश्वास वाढतो. उदारमतवादी रचनेमध्ये या पूर्वअटींची पूर्तता होणं आवश्यक असतं, तरच राज्यसंस्थेला लोकांचा आदर आणि विश्वास मिळवता येतो. सरकारांच्या दृष्टीने दंड करणं वा शिक्षा करणं यांसारख्या काही गोष्टी अस्तित्वाची पूर्वअट म्हणून येतात, पण त्याच अपमानाचा दावा ज्या आधारे केला जातो ती कारणं समूळ नष्ट करण्याची नैतिक परिस्थितीही याचमुळे सरकारला प्राप्त होत असते. परंतु, विद्यमान झारखंड सरकारसह अनेक राज्य सरकारांमध्ये या पूर्वअटी कमी-अधिक प्रमाणात अनुपस्थित असतात, ही वस्तुस्थिती आपल्याला मान्य करायला हवी. झुंडीच्या हिंसाचाराविरोधात वेळेत आणि सातत्यपूर्ण कारवाई न करता केवळ अपमानाच्या संदर्भात दावे करत राहिलं, तर सरकारच्या कामगिरीचं चिकित्सक मूल्यमापन करणं अवघड होऊन बसतं. चिकित्सक मूल्यमापन व्हायचं असेल तर निर्णयप्रक्रियेच्या पातळीवरील लोकांनी काही पावलं मागे जाण्याची गरज असते.

काही पावलं मागे घेणं ही स्व-मूल्यमापनाची किंवा स्व-तपासणीची सक्रिय प्रक्रिया असते, आणि सत्ताधारी पक्षाने नियमितपणे अशी प्रक्रिया पार पाडणं अपेक्षित असतं. थोडं मागे सरणं, याचा अर्थ, देशातील नागरिकांच्या कल्याणाची हमी व संरक्षण यांसाठी आखून दिलेल्या घटनात्मक नियमांपासून मागे हटणं, असा नव्हे. सरकारला स्वतःची कामगिरी सुधारण्यासाठी आणि अधिक चांगले शासन चालवण्यासाठी यातून संधी मिळत असते. स्वाभाविकपणे सत्ताधारी सरकारवर टीका करताना विरोधकांनी दिलेली कारणं अशा कामगिरीतून पुसली जातात. थोडं थांबून स्वतःच्या कामगिरीबाबत चिंतन केलं, तर न्याय्य व वैध टीकेला अपमान मानण्याची गरज उरणार नाही.

●

## एकत्रित निवडणुका वि. उत्तरदायित्व

*निवडणुका हे केवळ सरकार निवडण्याचं एक साधन असतं की अर्थपूर्ण लोकशाही उपक्रम असतो?*

'एक राष्ट्र, एक निवडणूक', हा मुद्दा भारतीय जनता पक्षासाठी (भाजप) अग्रक्रमामध्ये आघाडीवर आहे. १९ जून २०१९ रोजी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीमध्ये या प्रस्तावावर प्राधान्याने चर्चा घेण्याच्या कृतीमधूनही भाजपचा हेतू स्पष्ट झाला. लोकसभा आणि राज्य विधानसभांसाठी एकाच वेळी निवडणुका घेण्याची संकल्पना निर्धारित करायचा भाजपचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधील घटकपक्षांनी व मोजक्या प्रादेशिक पक्षांनी ही संकल्पना स्वीकारल्याचं दिसत असलं, तरी काही विरोधी पक्षांनी या संकल्पनेला विरोध केला आहे. राज्यघटनात्मक लोकशाही व संघराज्यवाद यांच्यावर अशा निवडणुकीचा विपरित परिणाम होईल, असा युक्तिवाद विरोधकांनी केला आहे. अशा प्रक्रियेतून सत्ताधारी पक्षामधील एकाधिकारशाही प्रवृत्ती दृढ होतील, अशीही शंका अनेकांनी उपस्थित केली आहे. त्यामुळे या संबंधीत चर्चाविमर्श होण्याची व काळजीपूर्वक विचार करण्याची गरज आहे.

एकत्रित निवडणुका घेण्याची संकल्पना नवीन नाही. निवडणूक आयोगाने १९८२ साली आणि कायदा

आयोगाने १९९९ साली ही संकल्पना मांडली होती. पण अलीकडे नीती आयोगाच्या सदस्यांनी मांडलेला चर्चानिबंध व कायदा आयोगाने तयार केलेला अहवाल, यांमुळे या मुद्द्याला जोर मिळाला आहे. शिवाय, पंतप्रधानांनीही त्यांच्या भाषणांमधून व स्वगतांमधून या संकल्पनेचा जोरकस प्रचार सुरू ठेवला आहे, त्यामुळे हा मुद्दा राजकीय महत्त्वाचाही ठरून गेला. या संकल्पनेला मुख्यत्वे कार्यक्षमता व खर्च या संदर्भातील युक्तिवादांद्वारे आधार पुरवला जातो. एकत्रित निवणुका घेतल्या तर खंडित व यथाक्रम निवडणुका घेण्यावरचा एकंदर खर्च कमी होईल, असं सांगितलं जातं. १९६९पासून सर्वसाधारणतः अशा यथाक्रमाने निवडणुका झालेल्या आहेत. एकत्रित निवडणुका झाल्यास वेगवेगळ्या वेळी आदर्श आचारसंहितेमुळे निर्णयप्रक्रियेत निर्माण होणारे अडथळेही दूर होतील, असं सांगितलं जातं. असे युक्तिवाद मूलतः व्यवस्थापकीय/साधनात्मक स्वरूपाचे आहेत आणि राज्यघटनेतील तत्त्वं व लोकशाही मूल्यं यांच्याविषयी फारसा आदर यात राखला जात नाही.

ही संकल्पना अंमलात आणायची असेल तर अनेक विद्यमान राज्य विधिमंडळांचा कार्यकाळ मधेच संपुष्टात आणावा लागेल, म्हणजे लोकशाही जनाधाराचा उपमर्द केल्यासारखं होईल. कलम ३५६ लागू न करता ही प्रक्रिया पार पाडायची असेल आणि एकमताने ती पुढे न्यायची असेल, तरी त्यातून संघराज्यप्रणालीच्या तत्त्वाला बाधा होण्याची शक्यता राहातेच. मुळात तत्कालीन केंद्र सरकारने मर्यादोल्लंघन केल्यामुळे निवडणुकांच्या एकत्र असण्याचा क्रम चुकला, आणि राजकीय शक्तींच्या परस्परसंबंधांमधील बदलामुळेही हा क्रम मागेपुढे होत गेला, पण यातून संघराज्यप्रणाली दृढ होण्याला सहाय्यच झालं आहे. राज्य पातळीवर प्रश्नांची विशिष्टता आणि त्यांना ठळकपणे हाताळणाऱ्या प्रादेशिक शक्ती यांना अधिक आवाका व अवकाश लाभतो, विशिष्ट राज्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकांवर ते लक्ष केंद्रित करू शकतात. एकत्र निवडणुकांमुळे ही विशिष्टता पुसली जाण्याचा धोका आहे आणि केंद्रीय पूर्वग्रह दृढ होण्याचा- विशेषतः प्रचंड संसाधनांचं केंद्रीकरण व कथनाचं नियंत्रण एकाच पक्षाकडे जाण्याचा मोठा धोका आहे. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांपासून वेगळ्या विविध विधानसभा निवडणुका होतात, त्यातून केंद्र सरकारवर लोकशाही दबाव येत असतो. शिवाय, भिन्न वेळांना होणाऱ्या निवडणुकांमुळे केंद्र सरकारला स्वतःची लोकविरोधी धोरणं दुरुस्त करणं आणि जनतेच्या मागण्यांकडे लक्ष देणं भाग पडण्याची शक्यता वाढते.

लोकांना विधिमंडळाच्या माध्यमातून कार्यकारीसंस्था उत्तरदायी असते, या तत्त्वाचा भंग एकत्रित निवडणुकांच्या प्रस्तावाद्वारे होतो. एकत्रित निवडणुका कायम राहायच्या असतील, तर सरकारांचा कार्यकाळ निश्चित ठेवणारी तरतूद करावी लागेल. अशी तरतूद नसेल, तर केंद्रातील वा राज्यातील एखाद्या सरकारविरोधात अविश्वासाचा ठराव यशस्वी ठरल्यास एकत्र निवडणुकांचा क्रम पुन्हा मोडेल, आणि मध्यावधी निवडणुका घेणं आवश्यक ठरेल. अशा परिणामाची हाताळणी करण्यासाठी तथाकथित रचनात्मक अविश्वासाचा ठराव (पर्यायी रचनेची शक्यता सिद्ध करूनच हा ठराव आणता येतो), राष्ट्रपती राजवट, किंवा उर्वरित कालावधीपुरत्या तत्काळ निवडणुका असे प्रस्ताव समोर येतात. यांपैकी कोणतीही संकल्पना राज्यघटनेत नमूद नाही. निश्चित कार्यकाळाचं समर्थन करताना स्थैर्य व सातत्य या मूल्यांवर खूप भर देण्यात आला आहे, आणि लोकशाहीतील गुणवत्तेच्या स्थितिशीलतेला सकारात्मकरित्या अडथळा आणण्याची कृती अपरिहार्य मानली जाते. अविश्वासाचा रचनात्मक ठराव विधिमंडळाच्या उत्तरदायित्वाचं स्खलन करतो. लोकशाहीमध्ये उत्तरदायित्वाहून स्थैर्याला प्राधान्य असतं का, असा प्रश्नही यातून उपस्थित होतो. असं स्खलन झालं तर भारतीय राज्यव्यवस्थेच्या राष्ट्राध्यक्षीकरणाची

विद्यमान प्रक्रिया आणखी जोर पकडेल. एकत्रित निवडणुका बड्या राष्ट्रीय पक्षांना अवाजवी लाभदायक आहेत, कारण त्यांच्याकडे जास्त संसाधनं असतात व त्यांची पोच जास्त असते. शिवाय, या प्रक्रियेमध्ये राजकीय स्पर्धा द्विपक्षीय व नेत्यांच्या व्यक्तिमत्वांवर लक्ष केंद्रित करणारी होईल.

उपरोल्लेखित 'व्यवस्थापकीय साधनरूपा'तील संकल्पना ही मूलतः लोकशाहीच्या आदर्शलक्ष्यी आशयाच्या- लोकाधारित सार्वभौमतेच्या- विरोधात जाणारी आहे. या संकल्पनेनुसार, लोक-राष्ट्र यांच्या नियमनासाठी सरकार निवडण्याची एक प्रक्रिया किंवा पद्धत एवढंच महत्त्व निवडणुकांना असतं. (अशा व्यवस्थापकीयवादाच्या टोकाच्या रूपांमध्ये निवडणुका या शासनामधील अडथळा मानल्या जातात). लोक निष्क्रिय मतदार असतात, त्यांना दर पाच वर्षांनी मत तेवढं द्यायचं असतं आणि मग ते सार्वजनिक कामकाजामधून माघार घेतात व असं सर्व कामकाज कार्यकारीमंडळाकडे सोपवतात, अशी धारणा यामागे आहे. परंतु, राममनोहर लोहियांनी म्हटल्याप्रमाणे, झिंदा क़ौमें पाच साल इन्तेजार नही कर सकती (जिवंत जनता पाच वर्षं वाट बघू शकत नाही). संसदेबाहेरची लोकआंदोलनं व चळवळी, यांच्यासोबतच विविध राज्यांमधील निवडणुकांमुळे लोकांच्या या कामकाजाच्या अभिव्यक्तीला अवकाश मिळतो आणि हा अवकाश लोकशाहीच्या आरोग्यासाठी आवश्यक असतो. शेवटी, लोकाधारित सार्वभौमतेचं तत्त्व अंमलात आणण्याचा उपक्रम म्हणजेच निवडणुका. पैसा व माध्यम यांचं प्रभुत्व असलेल्या निवडणुकांमध्ये अशा लोकाधारित अंमलबजावणीला किती अवकाश मिळेल, याबद्दल वाद होऊ शकतो, परंतु एकत्र निवडणुकांमधील अंतःस्थ तर्कामध्ये या शक्यतेवरच पूर्णविराम लावला जातो. ●

---

## कोरडं वर्तमान, कोरडं भविष्य

*पाण्याचं संकट अधिकाधिक बिकट होत असताना सरकारने पाणी व्यवस्थापनाच्या बाबतीत सारासार विचार ठेवण्याची गरज आहे.*

भारताच्या अनेक भागांमध्ये उशिरा का होईना पावसाचं आगमन झालं आहे. शेकडो लोकांचा बळी घेणारा उष्माघात संपवण्यासाठी पावसाची आतुरतेने वाट पाहिली जात होतीच, शिवाय पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळेही असुरक्षिततेमध्ये वाढ झाली होती. चेन्नई व रांची यांसारख्या शहरांमध्ये पाणीसंकटामुळे हिंसक संघर्ष झाले आणि तणाव व हताशा पसरली. तलाव व जलसाठे कोरडे पडल्यामुळे लोकांना दैनंदिन पाण्याची गरज भागवण्यासाठीही एकमेकांशी भांडावं लागलं. परंतु, पाण्याचं दुर्भिक्ष्य केवळ याच शहरांमध्ये आहे असं नाही, तर देशातील अनेक भागांमध्ये दुष्काळ सदृश परिस्थिती पसरलेली आहे.

मान्सूनला झालेला उशीर किंवा कमी पाऊस एवढंच यामागचं कारण नाही. खोल खणून- खरवडूनही फारसं पाणी मिळणं अवघड बनल्यामुळेही दुष्काळाचे परिणाम अधिक तीव्रपणे जाणवायला लागले. महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यामध्ये बर्डेची वाडी गावातील स्त्रियांना कुटुंबाकरिता पिण्याचं पाणी मिळवायला साठ फूट खोल विहिरीत उतरून स्वतःचा जीव धोक्यात घालावा लागतो. भारतातील भूजल पातळी प्रचंड वेगाने खालावते आहे. भारतात भूजल सार्वजनिक हिताची वस्तू मानलं जात नाही. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, खरगपूर'ने केलेल्या अभ्यासानुसार, बहुतांश देशवासीयांना पाणीवापरासाठी 'शक्य आहे त्याहून अधिक खर्च' करणं भाग पडतं आहे, आणि बहुतेकदा 'जलसंपन्न' मानला जाणारा पूर्व भारतही भविष्यात

'भूजल दुष्काळ' अनुभवण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याचं दुर्भिक्ष्य ही केवळ सुटी समस्या मानता येणार नाही. प्रतिबंधात्मक उपाय न योजल्यामुळे पाणीसंकट साचत राहिलं आहे.

पाणीसंकटाद्वारे लिंगभाव, जात व प्रदेश यांच्यातील विषमताही पुन्हा अधोरेखित झाल्या आहेत. संकटाच्या परिस्थितीत पाण्याची तजवीज करण्याची जबाबदारी स्त्रियांवर येते, पण त्याच वेळी महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यामध्ये डेंगणमाळ गावासारखीही परिस्थिती पाहायला मिळते. या गावातील पुरुष केवळ 'पाणीवाली बाई' मिळण्यासाठी दोनदा वा तीनदा लग्न करतात, जेणेकरून दिवसभरात सतत पाणी आणण्याचं काम सुरू राहील. विशेष म्हणजे अशी गावं नद्यांच्या व धरणांच्या जवळ आहेत, पण पाणीपुरवठा मुंबईच्या दिशेने जातो, आणि या गावांमधील स्त्रिया मात्र कष्टाने दीर्घ अंतर चालत जाऊन पाणी शोधत राहातात. एवढं केल्यानंतरही या स्त्रियांना घरातील पाण्याचा वापर करायची सर्वांत शेवटची संधी मिळते.

पाण्याची उपलब्धता अधिकाधिक कमी होत जाते आहे आणि खर्च व लाभार्थी ठरवण्यामध्ये बाजारपेठेची भूमिका अधिकाधिक महत्त्वाची ठरू लागली आहे, त्यामुळे पाण्यावर नियंत्रण ठेवण्याचे मार्ग विशेषाधिकारी वर्गांना मिळत जातात. न्याय्यरित्या पाणी वाटून घेण्याच्या बाबतीत अंगभूतरित्या विषमता आहे. पाण्याची उपलब्धता उत्पन्न आणि सामाजिक दर्जावर अवलंबून असते अशा दिल्ली व मुंबईसारख्या महानगरांमध्ये हे स्पष्टपणे दिसतं. चेन्नईप्रमाणे संकटाच्या काळात निवासी इमारतींना दर दिवशी तीन वा चार टँकरांवर पैसे खर्च करणं शक्य होतं, पण कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना हे शक्य नसतं. ग्रामीण कुटुंबांपैकी केवळ १८ टक्के कुटुंबांना पाइपद्वारे पाणी मिळतं. लहान शेतकऱ्यांची परिस्थिती तर याहून बिकट असते. दुष्काळाच्या काळात त्यांना एकतर आत्महत्या करावी लागते किंवा स्थलांतर करावं लागतं. महाराष्ट्रातील मराठवाडा, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशातील बुंदेलखंड आणि उत्तराखंडमधील पर्वताळ प्रदेश या ठिकाणची अनेक कोरडी गावं तर निर्मनुष्य झाली आहेत.

दूर अंतरावरून जास्त किंमतीला वाहून आणलेल्या पाण्यावर भारतातील शहरं चालतात, या प्रक्रियेत काही पाणी वायाही जातं. पाणी साठवून ठेवणाऱ्या तळ्यांसारख्या रचनांकडे शहरांनी दुर्लक्ष केलं आहे. एकट्या चेन्नईत ३५०हून अधिक तलाव नामशेष झाले आहेत. शहरांचा विस्तार होत असला तरी त्यासाठी किती पाणी उपलब्ध करून द्यावं लागेल याचा विचार केला जात नाही, पावसाच्या पाण्याचं संवर्धन आणि सांडपाण्याचा पुनर्वापर, त्यावरील प्रक्रिया, शुद्धीकरण यांचाही विचार केला जात नाही. बांधकाम क्षेत्राच्या महाकाय वाढीमुळे टँकर लॉबी बळकट झाली आणि पाणी काढण्याचं प्रमाण वाढलं, त्याचसोबत पूरप्रदेश व हरित आवरणं बळकावण्याचे प्रकारही वाढले. पाणी असलेली ठिकाणं बुजवून तयार झालेल्या 'जमिनी'वर अतिक्रमण केलं जातं, त्यामुळे पाणी साठवण्याच्या शक्यता कमी झाल्या आणि पूरस्थितीची शक्यता वाढली.

शहरांमधून व उद्योगांमधून बाहेर पडणाऱ्या पाण्याची गुणवत्ता हाही चिंतेचा मुद्दा आहे. अशा प्रकारच्या दृष्टिकोनामुळे देशातील जवळपास ७० टक्के पाणीपुरवठा दूषित असतो, त्यातून दर वर्षी अंदाजे दोन लाख मृत्यू होतात, असे नीती आयोगाच्या एका अहवालात नमूद केलं आहे. शहरांजवळची बहुतांश शेती प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यावर होते, या सांडपाण्यात अवजड खनिजं व विषारी रसायनं असतात, त्यातून पुढे सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होतो.

सध्याचं पाणीसंकट हे केपटाउनमध्ये उद्भवलेल्या 'शून्य दिवसा'शी साधर्म्य सांगणारं असल्याचं मत नीती आयोगासह अनेकांनी व्यक्त केलं आहे. अनेकांनी प्रलयाच्या शक्यताही व्यक्त केल्या. परंतु, अशा अंदाजांनी केवळ घबराटीचं वातावरण निर्माण होतं

आणि अशा वेळी केले जाणारे ‘उपाय’ परिस्थिती आणखी बिघडवणारे ठरतात. सध्या अस्तित्वात असलेल्या औष्णिक ऊर्जा प्रकल्पांची कामगिरी वाईट असल्याचा दाखला असतानाही नदीजोड प्रकल्पाचं समर्थन केलं जातं, त्यातून केवळ आपत्तीजनक परिस्थितीच निर्माण होईल आणि संघर्षात भर पडेल. घोंघावत असणारं पाणीसंकट आणि त्यासोबत येणारी अन्न व आरोग्याविषयीच्या असुरक्षितता, यांचा विचार करता पाणी कार्यक्षमतेने वापरण्यासाठी शहाणीव दाखवणं गरजेचं आहे.

या परिस्थितीची भविष्यातील मार्गक्रमणा बदलता येऊ शकते. परंतु, त्यासाठी पाण्याचा उचित वापर करणारी पिकं घ्यावी लागतील, तशी जीवनशैली अंगिकारावी लागेल, जलसाठ्यांमध्ये वाढ करावी लागेल आणि पाण्याच्या वापराचं नियमन करावं लागेल. शिवाय, पाण्याच्या उपलब्धतेमधील विषमतेचा विचार करणारी आणि पाणीवापराची वर्तमानातील आकडेवारी ध्यानात घेणारी धोरणं आखावी लागतील. केवळ अभियांत्रिकी व तांत्रिक उपाय योजण्याऐवजी आपण हे लक्षात घ्यायला हवं की, सुदृढ व नैसर्गिक स्थितीमधील जलसाठे असतील तर हवामान संकटाची तीव्रता आटोक्यात ठेवता येते आणि हे साठे स्वतःला पुन्हा भरून काढू शकतात.

●

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी ‘एच. टी. पारेख फाउंडेशन’चे साहाय्य लाभले आहे. (दि. २९ जून २०१९ या अंकातून. ‘सार्वजनिक संस्थांची प्रतिष्ठा’ हे संपादकीय गोपाळ गुरू यांनी लिहिले आहे.)





क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी
आणि
हरिती प्रकाशन, पुणे

यांचे संयुक्त प्रकाशन

जातिप्रश्नाचा साधार व चिकित्सक वेध घेऊन
जातिमुक्त समाजनिर्मितीसाठी सकारात्मक दृष्टी देणारे पुस्तक

समकालीन भारत : जातिअंताची दिशा
दिलीप चव्हाण

पाने : सतरा + २६०, किंमत : ₹ २५०
प्रकाशनपूर्व नोंदणी : ₹ १०० + टपाल खर्च : ₹ ३५

संपर्क

सचिन भटकर

क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी

द्वारा – जयकुमार पंजाबराव रूपनारायण

शासकीय विदर्भ ज्ञान–विज्ञान महाविद्यालयामागे, गणेश पेठ, अमरावती – ४४४ ६०५.

मो. ९९६०७३१८१५